# मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे पावसमध्ये आरोग्य शिबीर

**रत्नागिरी (प्रतिनिधी) :** आरोग्य व शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या मुकुल माधव फाऊंडेशनने आयोजित केलेले पाचवे मोफत आरोग्य तपासणी शिबीर पावस येथे पार पडले. या शिबिरामध्ये अडीच हजार ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून, तपासणी केली. चार दिवसात सहा ठिकाणी आयोजित केलेल्या शिबिरामध्ये पुणे व रत्नागिरीसह सुमारे ३० वैद्यकीय अधिकाऱ्यांचे पथक कार्यरत होते.

पावस येथे बालरूग्णांसाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर कसोप-फणसोप येथील लक्ष्मीकेशव विद्यामंदिर, पावसमधील स्वरूपानंद विद्यामंदिर, गोळपमध्यील मुकुलमाधव विद्यालय, भोके मावंगडेवाडी येथील जि. प. प्राथमिक शाळांमधील विद्यार्थी व या विद्यार्थ्यांचे पालक यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. यासाठी पुणे येथील देसाई नेत्ररूग्णालयाचे नेत्रतज्ज्ञ, केइएमचे कर्णतज्ज्ञ, डॉ नंदा डेंटल केअर पुणेचे दंतवैद्य, रत्नागिरीमधून डॉ. आशुतोष मुळ्ये, डॉ. महेश पोखरणकर, डॉ. विवेक कामत, डॉ. स्मीता गोरे, डॉ. शरद प्रभूदेसाई, डॉ. राजदीप चौधरी, डॉ. ज्योती चव्हाण, डॉ. अमृता गुरव, डॉ. योगिता चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

नाखरे येथील गुरूकृपा सेवा मंडळाच्या सहकार्याने सुमारे साडेतीनशे ग्रामस्थांसाठी पुण्याच्या रूबी हॉल क्लिनिक हॉस्पीटलच्या २० तज्ज्ञांनी तपासणी केली. यामध्ये संजय लावंड, डॉ. संदीप मुनोत, डॉ. विवेक गायकवाड या हृदयरोगतज्ज्ञांचा समावेश होता. रक्तशर्करा, ई.सी.जी., बी.एम.आय., तपासण्या गरजूंना मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. सरपंच सौ. नार्वेकर उपस्थिती होत्या.



मंडळाचे सचिव संतोष घवाळी, विनायक भाटकर व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी आयोजनात मदत केली. फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया यांच्या मार्गदर्शनाखाली कंपनीचे सचिव अनिल अत्रे, यांच्या नेतृत्वाखाली उल्हास सप्रे, पल्लवी कोकितकर, पूजा प्रभू, मोनिका भिलारे, योगेश सामंत, संजय शिंदे, बाबाजी नवेले, विष्णू शिंदे व राजन मयेकर यांनी विशेष काम पाहिले.